# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक ११/०१/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. २९/१२/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. २९/१२/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.मनिषा जाधव सूचक :- मा.श्री. मिलिंद घरत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २ | वसई तालुक्यामधील महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस विभागास जीप वाहने खरेदी करणेस मंजुरीबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करण्यांत आले असता त्यावर सभेमध्ये चर्चा करणेंत येऊन महानगरपालिकेसाठी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लि. कंपनीकडून BOLEROZLX पध्दतीची शासकीय दरकरारानुसार ७ वाहने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसुचि ड प्रकरण ५ चे कलम २ (२) अन्वये निविदा न मागविता खरेदी करणेसाठी कंपनीस आगावू रक्कम अदा करणेंस व इतर अनुषंगिक खर्चाकरीता होणारी रक्कम रु. ४९,८४,८६१/- पर्यंतच्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.कांता पाटील सूचक :- मा.श्री.प्रकाश रॉड्रीक्स<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३ | वसई-विरार शहर महानगरपालिकेस सन २०१६ वर्षाची स्वतंत्र दिनदर्शिका तयार करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या दरवर्षी दिनदर्शिका छपाई करून घेण्यांत येतात. त्याचेप्रमाणे यावर्षी देखील दिनदर्शिका छपाई करुन घेणेच्या आहे. सदर बाबत सभागृहात साधक बाधक चर्चा करणेत येवून सभेने असा निर्णय घेतला की, दिनदर्शिका ह्या २५००० नग छपाई न करता फक्त १०००० नग ई-निविदा प्रक्रियेद्वारे छपाई कराव्यात. याकामी येणाऱ्या रक्कम रु. ५ लक्ष पर्यंतच्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.मनिषा जाधव सूचक :- मा.श्री.अब्दुल हक पटेल<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ४ | प्रभाग समिती क कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू.) स.नं.२९ (क) मध्ये सर्वोदय वसाहत येथे संरक्षक भिंत बांधणे (सन २०१४-१५) कामी मंजूर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे. द्वारका कन्स्ट्रक्शन ह्यांची निविदा (अंदाजपत्रकापेक्षा ०.७५%) जास्त दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेसाठी मा.स्थायी समितीवर मान्यतेसाठी ठेवणेंस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. या कामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करणेसाठी ही सभा अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.कांता पाटील सूचक :- मा.श्रीम.मनिषा जाधव<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| ५ | वसई-विरार शहर महानगरपालिकेचा माहे जुन २०१५ अखेरचा त्रैमासिक अहवाल मा. स्थायी समिती सभेपुढे सादर करणे. | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या जून २०१५ अखेरच्या जमा-खर्चास शिफारशीनुसार मान्यता देणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.मिलिंद घरत   सूचक :- मा.श्री.अब्दुल हक पटेल<br>ठराव सर्वानुमते मंजूर |